# यवतमाळ जिल्हा पोलीस राजपत्र
# दिनांक - 05/06/2020

राजपत्रातील ०६ भाग –

| | |
|---|---|
| भाग – ०१ | **बदली /नेमणुक /पदोन्नती** |
| भाग – ०२ | **रजा** |
| भाग – ०३ | **वेतन/भत्ते / रोखिकरण** |
| भाग – ०४ | **बक्षिस / मानधन** |
| भाग – ०५ | **शिक्षा/ निलंबन / सेवानिवृत्ती** |
| भाग – ०६ | **प्रशिक्षण व इतर** |

---

मा. पोलीस अधीक्षक, यांचे मान्यतेनुसार

( एम. एम. बागवान )
पोलीस उप अधी.(मुख्या)
पोलीस अधीक्षक यवतमाळ करीता

प्रति,

<u>प्रभारी अधिकारी, सायबर सेल यवतमाळ</u> :– सदरचे गॅझेट हे जिल्हा पोलीस दल यवतमाळ चे www.yavatmalpolice.gov.in या अधिकृत संकेत स्थळावर GAZETTE या मथळयाखाली प्रसिद्ध करावे. तसेच जिल्हयातील प्रत्येक पोस्टे./उपविपोअ./अधिकारी यांचे E - Mail वरती पाठवावे.

# भाग १ - बदली /नेमणुक /पदोन्नती

महाराष्ट्र पोलीस

जावक क्रमांक :- पोअय/डिपी 31-बी-2/संलग्न-245/ 4340 /2020
पोलीस अधीक्षक यवतमाळ, यांचे कार्यालय एल.आय.ची चौक यवतमाळ
दूरध्वनी क्रमांक :- 07232-256700 फॅक्स नंबर :- 07232-256710
Email- sp.yavatmal@mahapolice.gov.in
यवतमाळ, दिनांक :- 5 JUN 2020

---

## आदेश

पोना/245 निवृत्ती कुळसंगे नेमणुक, पो.स्टे दारव्हा यांना प्रशासकिय कारणास्तव पोलीस नियत्रंण कक्ष, यवतमाळ येथे संलग्न करण्यात येत आहे.

प्रभारी अधिकारी यांनी वर नमुद पोलीस कर्मचारी यांना तात्काळ संलग्नचे ठिकाणी हजर होणे कामी कार्यमुक्त करावे.

(एम. राज कुमार)
पोलीस अधीक्षक, यवतमाळ

प्रति,

ठाणेदार पो.स्टे दारव्हा/पोलीस नियत्रंण कक्ष, यवतमाळ

प्रत,

आस्थापना लिपीक/वेतन लिपीक-1/सआलि-2/राजपत्र लिपीक यांना माहिती व योग्य त्या कार्यवाहिस्तव

# भाग २ - रजा

क्रमांक :डीपी/३१-बी २/वेतन बंद/ पोना-१६०९गिरनाळे/ 4330 /२०२० यवतमाळ दिनांक 05 JUN 2020

वाचा - पो.अ.यांचे परीपत्रक क्र.- २/डीपी-३१बी/अन.गैरहजर/९५३२/२०१७ यवतमाळ दि.२०/९/२०१७

## आ दे श

खालील नमुद पोलीस कर्मचारी हे कोणत्याही प्रकारची पुर्व सुचना न देता अनाधिकृतपणे कर्तव्यावर गैरहजर असल्याने, यांचे माहे ६/२०२० पासुनचे वेतन तात्काळ बंद करण्यात यावे.

| अ.क्र | कर्मचारी नाव/पद/ब.नं | नेमणुक | गैरहजर असल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| १ | पोना/१६०९ साहेबराव गिरनाळे | पो.मु यवतमाळ | दि. २२/०३/२०२० पासुन कर्तव्यावर गैरहजर आहे. |
| २ | पोना/१८३९ संदीप तिजारे | पो.मु यवतमाळ | दि. ०८/०४/२०२० पासुन कर्तव्यावर गैरहजर आहे. |
| ३ | पोहवा/२३६ राजेंद्र साबळे | पो.मु यवतमाळ | दि. २२/०४/२०२० पासुन कर्तव्यावर गैरहजर आहे. |

(एम.राज कुमार)
पोलीस अधिक्षक, यवतमाळ.

प्रति,

वेतन लिपिक -१

प्रत - आस्था.लिपिक/सआली- १, ४/डीपीजी लिपिक/ रा.पो.नि. पो.मु. यवतमाळ यांना उचित कार्यवाहीसाठी.

क्र. प्रलि/५१-डी/परिवर्तीत रजा/पोनि अनिल किनगे/4336/२०२० यवतमाळ, दिनांक - 5 JUN 2020

## आदेश

**पोलीस निरीक्षक/ अनिल व्ही. किनगे, जिल्हा वाहतुक शाखा, यवतमाळ** हे स्वतःचे आजारपणामुळे दि.१५.०४.२०२० ते ०८.०५.२०२० पर्यंत २५ दिवस वैद्यकीय रजेवर होते. त्यांनी उपचाराबाबत सादर केलेल्या वैद्यकीय प्रमाणपत्रांवरुन त्यांचा रुग्णनिवेदनाचा २५ दिवसाचा रुग्ण कालावधी वैद्यकीय कारणास्तव, महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम १९८१, नियम क्र.६१ अनुसार **परिवर्तीत रजा** म्हणून मंजूर करण्यात येत आहे.

**(मा.पोलीस अधीक्षक यांचे आदेशान्वये )**

**(श्रीमती सुशिला पवार)**
प्र.कार्यालय अधीक्षक,
पोलीस अधीक्षक, यवतमाळ करीता.

**प्रति,**

पोलीस निरीक्षक/ **अनिल व्ही. किनगे, जिल्हा वाहतुक शाखा, यवतमाळ**

**प्रत,**

वेतन लिपिक-२/डिपीजी लिपिक यांना माहिती व उचित कार्यवाहीस्तव.

क्र. प्रलि/५१-डी/परिवर्तीत रजा/पोउपनि- ज्ञानदेव घुगे/ 4335 /२०२० यवतमाळ, दिनांक 25 JUN 2020

# आदेश

**पोलीस उप निरीक्षक/ ज्ञानदेव माणिकराव घुगे, पोलीस नियंत्रण काक्ष,यवतमाळ** हे स्वत:चे आजारपणामुळे दि.२२.०२.२०२० ते १८.०३.२०२० पर्यंत २६ दिवस वैद्यकीय रजेवर होते. त्यांनी उपचाराबाबत सादर केलेल्या वैद्यकीय प्रमाणपत्रांवरुन त्यांचा रुग्णनिवेदनाचा २६ दिवसाचा रुग्ण कालावधी वैद्यकीय कारणास्तव, महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम १९८१, नियम क्र.६१ अनुसार **परिवर्तीत रजा** म्हणून मंजूर करण्यात येत आहे.

**(मा.पोलीस अधीक्षक यांचे आदेशान्वये )**

**(श्रीमती सुशिला पवार)**
प्र.कार्यालय अधीक्षक,
पोलीस अधीक्षक, यवतमाळ करीता.

**प्रति,**

**पोलीस उप निरीक्षक/ ज्ञानदेव माणिकराव घुगे, पोलीस नियंत्रण काक्ष,यवतमाळ**

**प्रत,**

वेतन लिपिक-२/डिपीजी लिपिक /नियंत्रण कक्ष यांना माहिती व उचित कार्यवाहीस्तव.

क्रमांक :- पोअय/सआलि-1/सिक अहवाल/पो.कर्मचारी/4301/2020 यवतमाळ, दिनांक :- 5 JUN 2020

**<u>आ दे श</u>**

<u>पोहवा/432 संतोष भोरगे नेमणुक, पो.स्टे.पुसद ग्रामीण</u> यांची एकुन 281 दिवस सिक कालावधी बिनपगारी झालेली रजा परिवर्तीत रजेत मंजुरी बाबत दिनांक 28.05.2020 अन्वेय केलेली विनंती अमान्य करण्यात येत आहे.

**<u>(मा.पोलीस अधीक्षक यांचे आदेशान्वये)</u>**

**(एम.एम.बागवान)**
पोलीस उप अधीक्षक (मुख्या)
पोलीस अधिक्षक,यवतमाळ
करिता

प्रति,
ठाणेदार पो.स्टे.पुसद ग्रामीन

प्रत, वेतन लिपीक-1/डिपीजी लिपीक यांना माहिती व योग्य त्या कार्यवाहिस्तव.

# भाग ५ - शिक्षा/ निलंबन / सेवानिवृत्ती

क्रमांक:पोअय/डिपी/३१-बी-२/अं.आ/पो.नि-जाधव/तामील/4397/२०१९ यवतमाळ दिनांक : 5 JUN 2020

संदर्भ :- मा. वि.पो.म.नि यांचे आदेश क्र. अप कक्ष-५/यवतमाळ/पोनि-वडगांवकर/कसुरी/प्र.क.४२/अं.आ/२०२०/१७३७ अमरावती दिनांक ०५/०५/२०२०

विषय :- अंतिम आदेश प्रत तामील बाबत.
पो.नि/पितांबर जाधव, नेमणुक नियंत्रण कक्ष यवतमाळ.

***

उपरोक्त संदर्भांकित विषयान्वये, प्राप्त अंतिम आदेशाची मुळ प्रत पो.नि./पितांबर जाधव, यांना अदा करुन, दुय्यम प्रतिवर त्यांची दिनांकित स्वाक्षरी घेऊन ती दुय्यम प्रत या कार्यालयास सादर करावी.

सहपत्र : अंतिम आदेश मुळ व दुय्यम प्रत.

५.६.

(एम.एम.बागवान )
पोलीस उप अधिक्षक (मुख्या.)
पोलीस अधिक्षक कार्या. यवतमाळ

प्रति,

पो.नि/पितांबर जाधव, नेमणुक नियंत्रण कक्ष यवतमाळ.

मार्फत :- प्रभारी अधिकारी, नियंत्रण कक्ष यवतमाळ

प्रत :- अधिकारी आस्थापना लिपीक/डिपीजी लिपीक यांना माहिती व योग्य कार्यवाहीस्तव.

75

49

क्रमाक: अप/कक्ष-५/यवतमाळ/पोनि-वडगांवकर/कसुरी/प्र.क.४२/अं.आ/२०२०/ 1737 अमरावती दि.

05 MAY 2020

वाचा :- १) पोलीस अधीक्षक, यवतमाळ यांचे पत्र क्र. डिपी/३१-बी-२/कसुरी अहवाल/पोनि-जाधव/१२२४/२०१९ दि. २७.०१.२०२० अन्वये सादर केलेल्या कसुरी अहवालाची कागदपत्रे.

Dt. - 1 JUN 2020
Branch ....
S.P. ....
Addl. S.P. ....
Dy.S.P.H.Q. ....
O.S. ....
H.C. ....
L.N. No. ....

२) या कार्यालयाचे का.दा.नो क्र. अप/कक्ष-५/यवतमाळ/पोनि-जाधव/कसुरी-१०/कादानो/२०२०/१३०० दि. ०६.०३.२०२०

३) पो.नि. पितांबर जाधव नेमणुक, पो.स्टे. नेर जि. यवतमाळ यांनी सादर केलेले स्पष्टीकरण.

## आदेश

तुम्ही पोलीस निरीक्षक, पितांबर जाधव, नेमणुक, पोस्टे. नेर जि. यवतमाळ येथे कार्यरत असुन खालील प्रमाणे कसुरी केल्याचे आमचे निर्दशनास आणले आहे.

**कसुरी :-**

1110
11/6/2020

पो.नि./पितांबर जाधव नेमणुक, पो.स्टे. नेर येथे नेमणुकीस असुन दिनांक २७.०९.२०१९ रोजी पो.स्टे. नेर येथील सन २०१९-२० चे वार्षिक निरीक्षण दरम्यान कामकाजाचा व प्रलंबित गुन्हयाचा, अपर पोलीस अधीक्षक, यवतमाळ यांनी आढावा घेतला असता, पोनि/जाधव यांचे कामकाजामध्ये उणिवा आढळुन आल्या याबाबत अर्धशासकीय पत्र क्र. १४/८९४/२०१९ दि. ३०.०९.२०१९ अन्वये पो.नि./जाधव यांना १ ते १७ मुद्दयांवर खुलासा ०३ दिवसांचे आत सादर करणेबाबत आदेशित करण्यात आले होते. अर्धशासकीय पत्र क्र. १४६२/२०१९ दि. २५.१०.२०१९ अन्वये मुद्देनिहाय खुलासा विहीत मुदतीत सादर न करता १ महिना विलंबाने सादर केला आहे.

R6

सदर खुलाशाचे अवलोकन केले असता गुन्हयाचे निपटारा करण्याकरिता तपासी अधिकारी/अंमलदार यांना त्यांचे दप्तर निरीक्षण घेवुन सुचना दिल्या आहे. प्रलंबित गुन्हे निकाली काढुन पुर्तता अहवाल सादर करण्यात येते. मोटर वाहन कायदयाचे केसेस विनाकारण प्रलंबित राहणार नाही याची दक्षता घेतली आहे. रेकॉर्ड अद्यावत राहील याची दक्षता घेतली आहे. गंभिर गुन्हे दाखल होताच आम्ही स्वत: तपास करण्याची दक्षता घेतली आहे. दोषसिध्दीचे प्रमाणे वाढविण्याकरिता प्रयत्न करण्यात येत आहे. पो.स्टे. परिसरातील मोठया प्रमाणात दारुबंदी करण्यात आलेली आहे. मुदत बाहय दारुगोळा बदलवुन घेतली जाईल यांची दक्षता घेतली आहे. कर्मचारी यांना पेट्रोलबुक लिहीण्याबाबत सुचना देण्यात आलेल्या आहे. सरकारी निवासस्थान हे राहण्यायोग्य नसल्याने निवासस्थान मध्ये कोणते कर्मचारी राहत आहे यांची नोंद रजिस्टरला घेतलेली नाही. अशा मोघम स्वरुपाचा, बेजबाबदार आणि असमाधानकारक खुलासा सादर केला आहे.

महाराष्ट्र पोलीस नियमावली १९९९ नियम क्र. ३४ अन्वये प्रभारी अधिकारी म्हणुन त्यांचे पोलीस स्टेशन क्षेत्रातील गुन्हयास प्रतिबंध व गुन्हे निर्गतीकडे लक्ष देणे गुन्हे तपास आणि पो.स्टे. कामकाजाबाबतचे वरिष्ठांचे आदेशाची अंमलबजावणी करुन घेणे हे व हाताखालील पोलीसामध्ये योग्य प्रकारे शिस्त राखली जात आहे. हे पाहण्याची जबाबदारी प्रभारी अधिका-यावर असल्याने, त्यांच्यावर सोपविण्यात आली असता त्यांना नेमुन दिलेल्या कर्तव्यात जाणीवपुर्वक दुर्लक्ष करुन अत्यंत निष्काळजीपणा व बेजबाबदारपणा दाखविला आहे.

उपरोक्त कसुरी संबधाने अपचारी यांना या कार्यालयाचे दि. ०६.०३.२०२० अन्वये **" पुढील देय वार्षिक वेतनवाढ एक (०१) वर्षाकरिता (अपरिणामकारक) रोखण्याची शिक्षा का करण्यात येवु नये?"** याबाबत कारणे दाखवा नोटीस देण्यात आलेली होती. उपरोक्त कारणे दाखवा नोटीस संबंधाने अपचारी यांनी त्यांचे स्पष्टीकरण या कार्यालयास सादर केले.

पोलीस निरीक्षक, पितांबर जाधव यांचेविरुध्दचे संक्षिप्त कार्यवाहीचे कागदपत्राचे तसेच त्यांनी सादर केलेल्या खुलाशाचे बारकाईने अवलोकन केले असता त्यांचे स्पष्टीकरण संयुक्तिक व समाधानकारक वाटत नाही. अपचारी यांचे स्पष्टीकरणामध्ये बचावार्थ सांगण्यासारखे विशेष काहीही दिसुन येत नसल्याने आणि अपचारी यांनी केलेल्या कसुरीच्या अनुषगांने कारणे दाखवा नोटीस मध्ये प्रस्तावित केलेली शिक्षा योग्य असल्याने महाराष्ट्र पोलीस अधिनियम सुधारणा २०१३ अधिनियमाचे कलम २५ प्रमाणे प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन मी, **मकरंद रानडे विशेष पोलीस महानिरीक्षक, अमरावती परिक्षेत्र अमरावती** खालील प्रमाणे आदेश देत आहे.

**: आदेश :**

पोलीस निरीक्षक, पितांबर जाधव, नेमणुक, पोस्टे. नेर जि. यवतमाळ यांना त्यांच्या उक्त कसुरीसाठी या कार्यालयाचे का.दा.नो क्रमांक अप/कक्ष-५/यवतमाळ/पोनि-जाधव/कसुरी-१०/कादानो/२०२०/१३०० दि. ०६.०३.२०२० अन्वये प्रस्तावित करण्यात आलेली **" पुढील देय वार्षिक वेतनवाढ एक (०१) वर्षाकरिता (अपरिणामकारक) रोखणे "** ही शिक्षा कायम करण्यात येत आहे.

सदर शिक्षेने अपचारी व्यथीत होत असल्यास हे आदेश प्राप्त झाल्याचे दिनाकापासून ६० दिवसाचे आत मा. पोलीस महासंचालक, म.रा. मुंबई यांचेकडे योग्य मार्फतीने अपील अर्ज सादर करु शकतात.

**( मकरंद रानडे )**
विशेष पोलीस महानिरीक्षक,
अमरावती परिक्षेत्र, अमरावती

प्रति,

पोलीस निरीक्षक, पितांबर जाधव, नेमणुक, पोस्टे. नेर जि. यवतमाळ.

प्रत व मार्फतः- पोलीस अधीक्षक, यवतमाळ.

२/- सोबत सदर आदेशाच्या ३ प्रती पाठविल्या आहेत. पोलीस निरीक्षक, पितांबर जाधव, नेमणुक, पोस्टे. नेर जि. यवतमाळ यांनी सदर आदेशाची मुळ प्रत त्यांना अदा करुन दुय्यम प्रतीवर त्यांची दिनांकित स्वाक्षरी घेवुन ती प्रत या कार्यालयास सादर करावी. व उर्वरीत प्रत आपले अभिलेखावर ठेवावी.

4301

महाराष्ट्र पोलीस
सद्रक्षणाय खलनिग्रहणाय

पोअय/डीपी/३१बी/नापोशि-२४३७ दिनेश चव्हाण/नि.मु.आ.कार्य/ /२०२०
पोलीस अधीक्षक, यवतमाळ यांचे कार्यालय, एल.आय.सी. चौक यवतमाळ
दुरध्वनी क्रमांक :-०७२३२-२५६७०० फॅक्स क्रमांक:-०७२३२-२५६७१०
ई मेल आय डी :- sp.yavatmal@mahapolice.gov.in
दिनांक:- 5 JUN 2020

---

संदर्भ :- १) मपोप्रविना/कसुरी मा.पो.केंद्र उमरखेड/पोना-२४३७/२०२०-६९३ दि.२४/०२/२०२०
२) पोअय/डिपी/३१-बी/नापोशि-२४३७ दिनेश चव्हाण/निलंबन/२४८५/२०२० दि.०२/०३/२०२०
३) पोअ/मपोप्रविना/ मा.पो.केंद्र उमरखेड/पोना-२४३७/नि.मु.आ/२० ११४८ दि.१८/०५/२०२०

विषय :- नापोशि-२४३७ दिनेश चव्हाण नेमणुक महामार्ग पोलीस केंद्र, उमरखेड जिल्हा यवतमाळ हे निलंबन मुक्त झाल्याने निर्वाह भत्त्याची नियमानुसार आकारणी करणे बाबत.

---ooo---

उपरोक्त संदर्भ व विषयास अनुसरुन कळविण्यात येते की, नापाशि/२४३७ दिनेश गणेश चव्हाण नेमणुक महामार्ग पोलीस केंद्र उमरखेड जिल्हा यवतमाळ यांना संदर्भ क्रमांक ०३ अन्वये दि. १८/०५/२०२० रोजी निलंबन मुक्त केले आहे. नमुद कर्मचारी यांनी निलंबन मुक्त तामील प्रत दि.१९/०५/२०२० अन्वये स्विकारली आहे.

प्रकरणी नापोशि-२४३७ दिनेश चव्हाण यांना निलंबन मुक्त झाल्याने देय असलेल्या निर्वाह भत्याची नियमानुसार आकारणी करुन निर्वाह भत्ता अदा करण्यात यावा.

सहपत्र :- निलंबन मुक्त आदेश प्रत

(एम.एम. बागबान)
पोलीस उपअधिक्षक (मुख्या)
पोलीस अधीक्षक,यवतमाळ करिता.

प्रति,

कर्मचारी वेतन लिपीक - १ / महामार्ग पोलीस केंद्र करंजी

प्रत :- रो.पो.नि.पो.मुख्या,यवतमाळ/पोउपअधि (मुख्या)/आस्थापना लिपीक-५/राजपत्र लिपीक यांना माहीती व योग्य त्या कार्यवाहीकरीता.

दुय्यम प्रत.

कार्या.- पोलीस अधीक्षक, महामार्ग पोलीस प्रादेशिक विभाग, नागपूर
प्रशासकीय इमारत क्र. १ तीसरा मजला, सिव्हील लाईन, नागपूर
दुरध्वनी क्र.०७१२-२९८७१४८

जा.क्र.पोअ/मपोप्रविना/ म.पो.केंद्र,उमरखेड/पोना -२४३७/नि.मु.आ./२०- ११४८ नागपूर दिनांक १८/०५/२०२०

**कार्यालयीन आदेश**

१. ज्याअर्थी तुम्ही पोना/२४३७ दिनेश गणेश चव्हाण नेमणुक महामार्ग पोलीस केंद्र, उमरखेड जिल्हा - यवतमाळ आपणा विरूध्द म.पो.केन्द्र, प्रभारी अधिकारी, उमरखेड यांनी रिपोर्ट सादर केला की, आपण कर्तव्यावर असतांना सोबतचे कर्मचारी यांचे सोबत गैरवर्तन करणे , प्रभारी अधिकारी यांची आदेशाची अवमानता करणे, अशा आशयाचा रिपोर्ट म.पो.केन्द्र, प्रभारी अधिकारी, उमरखेड यांनी सादर केला आहे.

२. त्याअर्थी, पोना/२४३७ दिनेश गणेश चव्हाण नेमणुक महामार्ग पोलीस केंद्र, उमरखेड जिल्हा - यवतमाळ यांच्या विरूध्द सदर गैरवर्तणुक व शिस्तभंग विषयक कारवाई करीता आमचे कार्यालयीन आदेश क्रमांक पोअ/मपोप्राविना/कसुरी म. पो.केन्द्र. उमरखेड/ पोना - २४३७ /निलंबन/२०२०-६९३ ,नागपुर दिनांक २४/०२/२०२० च्या आदेशान्वये अंतिम आदेश होईपर्यत त्यांनी केलेल्या सदरच्या गैरवर्तनामुळे त्याना सदरचे आदेश प्राप्त झालेल्या दिनांकापासुन शासन सेवेतून **" निलंबित "** करण्यात आले होते.

३. त्याअर्थी, पोना/२४३७ दिनेश गणेश चव्हाण नेमणुक महामार्ग पोलीस केंद्र, उमरखेड जिल्हा - यवतमाळ . विरूध्द चौकशि अहवालाचे अधिन राहून त्यांना सदर आदेश प्राप्त झाल्याच्या दिनांका पासुन **" निलंबनातुन मुक्त करून, शासन सेवेत पुनःस्थापीत "** करण्यात येत आहे.

( संजय शिंत्रे ) भा.पो.से.
पोलीस अधिक्षक,
महामार्ग पोलीस नागपूर प्रादेशिक विभाग, नागपूर .

**प्रति,**

१) पोना/२४३७ दिनेश गणेश चव्हाण नेमणुक महामार्ग पोलीस केंद्र, उमरखेड जिल्हा - यवतमाळ

**प्रत मार्फत,**

पोलीस निरीक्षक, महामार्ग पोलीस विभाग, नांदेड

२/- वर नमुद आदेशाची मुळ प्रत तुम्ही १) पोना/२४३७ दिनेश गणेश चव्हाण नेमणुक महामार्ग पोलीस केंद्र, उमरखेड जिल्हा - यवतमाळ यांना अदा करून दुय्यम प्रतीवर त्यांची दिनांक व वेळेनिशी स्वाक्षरी घेवून दुय्यम प्रत या कार्यालयास सत्वर सादर करावी. व वरील नमुद कर्मचारी यांना म.पो.केन्द्र उमरखेड येथे कर्तव्यावर हजर करून पुढील कर्तव्याकरीता म.पो.केन्द्र, करंजी जि. यवतमाळ येथे रवाना करून त्याबाबतचा अहवाल म.पो.केन्द्र प्रभारी उमरखेड यांनी ईकडील कार्यालयास सत्वर सादर करावा

**प्रत माहीती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी सस्नेह अग्रेषित :-** मा. पोलीस अधिक्षक, यवतमाळ

२/- यांना विनंती करण्यांत येत की, तुम्ही पोना/२४३७ दिनेश गणेश चव्हाण नेमणुक महामार्ग पोलीस केंद्र, उमरखेड जिल्हा - यवतमाळ यांना त्यांचे निलंबन कालावधीतुन मुक्त झाल्याने त्यांना देय असलेल्या निर्वाह भत्त्याची नियमानुसार आकारणी करून निर्वाह भत्ता अदा करण्यात यावा.

**प्रत माहीतीस सादर :-** मा.अपर पोलीस महासंचालक (वा.)म.रा.मुंबई.

**प्रत :-** १) पोलीस उपअधिक्षक, महामार्ग पोलीस नागपूर प्रादेशिक विभाग नागपू
२) प्रभारी अधिकारी,म.पो.केंद्र, उमरखेड जिल्हा- यवतमाळ
३) प्रभारी अधिकारी, म.पो.केन्द्र, करंजी जिल्हा - यवतमाळ
४) राखीव पोलीस निरीक्षक, पोलीस मुख्यालय, यवतमाळ

NPC २४३७
दि. 19/5/2020

# भाग ६ - प्रशिक्षण व इतर

(10)

क्रमांक : पोअय/सआली-4/मयत/पोहवा-1516 राजकुमार/ 4329 /2020 यवतमाळ दिनांक -5 JUN 2020

आदेश

पोहवा/1516 राजकुमार उईके नेमणुक पो.स्टे. यवतमाळ शहर यांचे दिनांक 06/03/2020 ला निधन झाल्याने त्यांचे नाव यवतमाळ जिल्हा पोलीस दलाचे आस्थापणेवरून दिनांक 06/03/2020 रोजी पासुन कमी करण्यात येत आहे.

(एम.राज कुमार)

पोलीस अधिक्षक यवतमाळ

प्रति

पोलीस निरीक्षक यवतमाळ शहर

प्रतिलीपी :- प्रमुख लिपीक लेखा/प्रमुख लिपीक कर्मचारी आस्थापणा शाखा/निवृत्ती वेतन लिपीक/कार्यालय अधिक्षक/भ.नि.नि.लिपीक (03 प्रती)/वेतन लिपीक-1/वि.चौ.लिपीक/पली-2,5,6/डीपीजी लिपीक यांना आवश्यक कार्यवाहीस्तव